नि.फौ.ख.क्र.१२५/२०२५
सरकार वि. शैलेंद्र बेलेकर
नि.क्र.२५.

सरकारतर्फे **साक्षदार क्रमांक ४** यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
**नाव - रविंद्र वासूदेव बेलेकर,**
वय - ३७ वर्ष, व्यवसाय – मजुरी,
राहणार – अरोली, ता. मौदा, जिल्हा - नागपूर.

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. एस. जी. इंगळे यांच्यामार्फत -**

**१.** फिर्यादी माझी पन्ती असून आरोपी शैलेंद्र माझा मोठा भाऊ आहे. माझ्या आईचे नाव तान्हाबाई आहे व त्यांच्याकडे ६ एकर शेती असून आम्ही चार भाऊ नामे मी, रमेश वासूदेव बेलेकर (मयत), शिशुपाल वासूदेव बेलेकर व शैलेंद्र वासूदेव बेलेकर असे आहोत. तान्हाबाईने आरोपी शैलेंद्रला २ एकर शेती व बाकी तीन मुलांना प्रत्येकी १ एकर वाटून दिली.

**२.** घटना दिनांक २४.०४.२०२५ रोजी घडली होती. मी सकाळी १०.०० वाजता शेतामध्ये गेलो असता मला माझ्या शेताचे धुरे तोडलेले दिसले. म्हणून मी घरी येवून माझी पत्नी फिर्यादी हिला घेवून माझी आई तान्हाबाई यांच्याकडे बोलण्याकरिता गेलो. तान्हाबाईसोबत माझे बोलणे चालू असता, आरोपीने तिथे येवून मला व माझ्या पत्नीला शिवीगाळ करून, माझा गळा पकडला व मला बुक्क्यांनी मारहाण केली. आरोपीने अत्यंत घाणेरडी शिवीगाळ केली होती, म्हणून मी त्या शिव्या न्यायालयासमक्ष सांगू शकत नाही. सदर केलेल्या शिवीगाळमुळे मला खुप वाईट वाटले. मला आरोपीने काडीने मारले व धमकी दिली की, “तु माझ्या शेतातुन जावून दाखव". आरोपीने माझ्या शेतातील पांदण रस्ता (मातीचा कच्चा रस्ता) सुध्दा काढून फेकला. त्यानंतर मी व माझी पत्नी पो.स्टे., अरोली येथे गेलो. माझी पत्नी आधी पो.स्टे.ला गेली व त्यानंतर मी गेलो. फिर्याद माझ्या पत्नीने दाखल केली. त्यानंतर पोलीसांनी येवून माझे बयाण नोंदविले. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

नि.फौ.ख.क्र.१२५/२०२५
सरकार वि. शैलेंद्र बेलेकर
नि.क्र.२५.

**उलटपास आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. ए. एस. रेवतकर यांच्यामार्फत-**

**३.** तान्हाबाईच्या शेतीची वाटणी १० वर्षांपूर्वी झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, तान्हाबाई शिशुपालसोबत राहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, शिशुपालला एक एकर शेती जास्त दिली आहे. आरोपीने माझ्या शेतातील धुरे फोडले व पांदण रस्त्याला अडथळा निर्माण करतो याबाबतची तक्रार मी तहसिलदारांकडे केली आहे. सन २०२५ मध्ये मी माझ्या शेतात धान लावले होते व उत्पन्न घेतले होते.

**४.** मी माझी आई तान्हाबाईला शेतीची समान वाटणी करून देण्याबाबत बऱ्याच वेळा मागणी केली. हे म्हणणे खरे आहे की, त्या मागणीवरून वाद-विवाद झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडण्याच्या पूर्वीपासून आरोपीसोबत आमची बोलचाल बंद आहे.

**५.** पोलीसांना बयाण देतेवेळी मी "आरोपीने मला काठीने मारहाण केली" ही बाब सांगितली होती. पोलीसांनी तसा मजकूर माझ्या बयाणात का नमूद केले नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजूबाजूला लोकांची घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेल्या बाबी, आरोपीने मला व माझ्या पत्नीला शिवीगाळ केली, मारहाण केली, ह्या खोट्या सांगितल्या आहेत.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, मी व फिर्यादी तान्हाबाईच्या घरी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, तान्हाबाई जेवत असताना तिचे ताट आम्ही उचलून फेकले व तिच्यासोबत वाद-विवाद केला. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपी तेथे आला व त्याने आम्हाला अडविण्याचा प्रयत्न केला. हे म्हणणे खरे नाही की, मी काडी उचलून आरोपीला मारहाण केली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याविरूध्द आरोपीला मारहाण केल्याबाबत खटला सुरू आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या विरोधात दिलेल्या तक्रारीमुळे माझ्या पत्नीने आरोपीविरूध्द सदरचा खोटा गुन्हा नोंद केला. हे म्हणणे खरे

नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात आरोपीविरूध्द सांगितलेल्या बाबी घडल्या नाहीत.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

**सा.ब.वा.दा.ब.अ.क.के.**

श्रवणोत्तर स्वीकृत.　　　　　　　　　　समक्ष,

मौदा.　　　　　　　　　　Sd/-

दिनांक : १२.०५.२०२६　　　　　　　　**(एन.के. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मौदा.